... 2017
E-ISSN ...

# IRFA'S UNIRESEARCH

## Multidisciplinary International E-Research Journal

*Indexed in DRJI & Indian Citation Index* *Double Blind Peer Reviewed Journal*
UGC Approved List No. 63005
*Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

University Grants Commission

UGC Approved List of Journals

You searched for uniresearch
Total Journals : 1

Show entries Search

| S.No | Journal No | Title | Publisher | ISSN |
|---|---|---|---|---|
| 1 | 63005 | Uniresearch: Multidisciplinary International E-Research Journal | International Research Fellows Association | [illegible] |

Showing 1 to 1 of 1 entries

For Students For Faculty More

Chief Editor
Dr. Dhanraj Dhangar
Dept. of Marathi
MGV's Arts & Commerce College
Yeola, Dist. Nashik ...
Email: dhanrajdhangar...@gmail.com
Mob: 77598...

Swatidhan International Publications
For Details, visit us on: www.uniresearch.net.in

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | समाज चळवळीविषयक अस्मितादर्श मधील लेखन : काही नोंदी आणि निरीक्षणे | डॉ. सर्जेराव रणखांब | 106 |
| 26 | केळी फेको आंदोलन आणि 'पाडा' कादंबरी | गणेश सूर्यवंशी व डॉ आशालता महाजन | 115 |
| 27 | महात्मा फुले यांची अखंडादि काव्यरचना | डॉ.सुवर्णा गाडगे | 125 |
| 28 | मराठी ललित गद्य : स्वरूप व संकल्पना | डॉ. राजेंद्र वडमारे | 129 |
| 29 | 'भुईशास्त्र'मधील आदिम मातृसत्ताक संस्कृतीच्या अस्पष्ट खुणा | डॉ.प्रभाकर देसाई, प्रा.कैलास सलादे | 137 |
| 30 | 'धाडा चिरेबंदी' चार पिढ्यांचे संस्मरण | डॉ. बाबाराव ठाकरी | 141 |
| 31 | संत साहित्यातील सामाजिक समरसता | डॉ. दिनेश पाटील | 145 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | डॉ. अंजली मस्करेन्हस | 148 |
| 33 | शिवरायांचा राजधर्म | डॉ. गणेश गिरी | 152 |
| 34 | महात्मा फुले यांचे आर्थिक विचार | डॉ. सुरेश बन्सपाल | 154 |
| 35 | मुस्लिम साहित्य : स्वरूप आणि वाटचाल | डॉ. सौ. उज्वला पाटील | 158 |
| 36 | मुलांमधील आक्रमकता : कारणे आणि उपाय | डॉ. रेखा साळुंखे | 162 |
| 37 | रजोनिवृत्तीच्या काळात महिलांना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन | प्रा. सुनीता जगताप | 168 |
| 38 | स्त्री चळवळ व महिलांचे सक्षमीकरण | प्रा. भागवत महाले | 175 |
| 39 | जागतिक दारिद्र्य : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. के. पी. वाघमारे | 180 |
| 40 | ग्रामपंचायतीतील महिलांचे सबलीकरण : विशेष संदर्भ कोल्हापूर जिल्हा | सौ. सरला आरबोळे | 184 |
| 41 | शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रामध्ये संगणकाचे महत्त्व | डॉ. डी. डी.भडके | 190 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- Executive Editor-

Contact us on : uniresearch99@gmail.com / researchjourney2014@gmail.com
Mobile No. : Prof. Dhanraj T. Dhangar - (President, IRFA) +91 7775982534 / 7620579291
Publisher : Mrs. Swati Dhanraj Sonawane – Director, Swatidhan Publiacation Yeola (Nashik) 423401
Mobile No. 9665398258

© - Swatidhan International Publications, Yeola (Nashik)

Price : Rs. 150/-

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953 (Online)
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020* | January - 2018
Vol. 10 Issue. 1

# समाज-चळवळी विषयक अस्मितादर्श मधील लेखन : काही नोंदी आणि निरीक्षणे (१९६८ ते १९७८)

प्रा. सर्जेराव रणखांब
(मराठी विभाग)
देगलूर महाविद्यालय देगलूर
Email id : sbrankhamb@gmail.com
मो.क्रं.९४२२५३३६६७

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एक महत्वाचा भाग म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर चळवळीमुळे होय. नवीन युग दलितांच्या जीवनात सुरु झाले. शेकडो वर्षांपासून पिचून गेलेल्या समाजाला या धर्मांतरामुळे नवीन विचार, नवीन जीवसृष्टी प्राप्त झाली. या संदर्भात अस्मितादर्शमधील परिसंवादातून सुध्दा चर्चा घडून आलेली आहे. अस्मितादर्शच्या मेळाव्यातून घडून आलेल्या या परिसंवादाचे विषयही वेगवेगळे आहेत. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतरण : प्रेरणा व फलित' या परिसंवादात प्रा.म.भि.चिटणीस, प्रा.अशोक गोडघाटे, प्रा.म.दा.नलावडे, रत्नाकर गणवीर, वसंत मनू, दयानंद मोहिते, सचिन तारागावकर व सौ.नलिनी पंडित यांनी सहभाग घेतला होता. परीसंवादाचे अध्यक्ष प्रा.रावसाहेब कसबे हे होते.

१९३५ मध्ये येवला येथे केलेल्या भाषणत आपण हिंदू म्हणून जन्मलो पण हिंदू म्हणून राहणार नाही अशी घोषणा त्यांनी केली. आजवर ज्यांना जीवनाच्या विविध क्षेत्रात नाकारले गेले. त्यांना एकत्रित करावे असा बाबासाहेबांचा हेतू होता. हिंदू जीवनपध्दतीबद्दल म.भि.चिटणीस म्हणतात, 'विषमता हा या समाजाचा कणा होय. तो चिकटलेला डाग नव्हे विषमतेवर आधारलेल्या प्रत्येक वर्गाला पृथगात्म स्वरुप देणारा हा धर्म आहे. परब्रम्ह किंवा सर्वव्यापी चैतन्यतत्व याचा व्यवहाराशी काही संबंध नाही हा धर्म व्यक्तीने काय करावे हे सांगत नसून जातीने काय करावे हे सांगतो'.[१]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्याचे फलित सांगताना चिटणीस म्हणतात की, आज निराशा करणारे चित्र दिसते कारण बुध्दिवादी वर्ग दलित समाजात अद्याप निर्माण झाला नाही. त्याची गरज आहे. तसेच या धर्मांतराने दैववादाचा व भ्रामककल्पनांचा नाश केलेला आहे असे आपले मत त्यांनी मांडले आहे. मार्क्सवाद व बुध्दवाद या संदर्भात त्यांनी मार्क्स हा नेहमी आर्थिकतेवर भर देतो पण ही आर्थिकता सर्वच क्षेत्रावर परिणाम करु शकत नाही. तर त्यासाठी आत्मसंस्कार महत्वाचा आहे आणि तो बुध्द धर्मात आहे. दोघांच्याही नैतिक प्रेरणा दुःख कमी करण्याच्या असल्या तरी मार्ग भिन्न आहेत असे सांगितले आहे. तर प्रा.अशोक गोडघाटे यांनी आपल्या परिसंवादातून बुध्द तत्वज्ञान मार्क्सवादापेक्षा अधिक व्यापक स्वरुपाचे आहे, असे सांगितले आहे.

बुध्द धर्माच्या संदर्भात आंबेडकरांचे हे कार्य म्हणजे या धर्माची पुनःस्थापनाच होती. म्हणून धर्मांतराकडे उदासीनतेने पाहून चालणार नाही असे सौ.नलिनी पंडित यांनी म्हटले आहे. 'धर्म ही एक आता खाजगी बाब राहू नये एकाच घरात नवरा हिंदू, बायको ख्रिस्ती, मुलगा बौध्दधर्मी असू शकेल, पण त्यासाठी त्यांनी काही मूल्ये पत्करली पाहिजेत'.[२] धर्माच्या संदर्भात आपण कोणत्या धर्माचा टिळा लावतो याला महत्व नसून, आम्ही कोणते मूल्य मानतो हे अधिक महत्वाचे आहे. बौध्दात कितीही अस्मिता असली तरी बाकीच्या पुरोगामी लोकांना त्यांनी बरोबर घेऊन चालले पाहिजे. पुरोगामी लोकात बाबासाहेबांची मूल्ये मानणारा एक गट आहे, पण त्यांना धर्म आवश्यक वाटत नाही, असे पंडितांनी सूचित केले आहे.

'बाबासाहेबांचे धर्मांतर हे उद्याच्या समाजवादी सम्यक-क्रांतीसाठी उभ्या राहणाऱ्या क्रांतिकारी समूहाच्या जाणिवात बदल करणारे एक साधन आहे'.[३] असं सांगत भांडवलशाही आणि चातुर्वर्ण्य व्यवस्था मोडून काढणाऱ्या व समाजवाद लोकशाहीची स्थापना करणाऱ्या क्रांतीचे नेतृत्व नवबौध्द तरुणच करतील. असा अंदाज आपल्या अध्यक्षीय भाषणातून रावसाहेब कसबेंनी व्यक्त केला आहे.

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020* | (Online)
Vol. 10 Issue. 1 | January - 2018

भारतीय धर्म, तत्वज्ञान व संस्कृतीची इतिहासात भगवान बुध्दाचे योगदान अनन्य आहे. मराठी संताच्या बाबतीत बुध्दाच्या प्रभावाचे विवरण व विश्लेषण संक्षिप्तपणे प्रा.भाऊ लोखंडे यांनी 'मराठी संत आणि बौध्दमत' (दिवाळी १९७३) या लेखात केलेले आहे. बुध्दिवाद, लोकभाषेचा पुरस्कार विरुध्दवाणीचा प्रभाव, शून्यवाद, हटयोग इत्यादींच्या संदर्भात संताच्यावर जो प्रभाव होता तो बुध्द धर्माच्या तत्वज्ञानाचाच एक भाग होता. त्याचाच मराठी संतांवर कसा प्रभाव होता याचे विश्लेषण केले आहे.

लोकभाषेच्या संदर्भात ते म्हणतात, 'मराठी संत साहित्यावर प्राकृत प्रेमाचा ठसा उमटलेला दिसतो सर्वच संतांनी प्राकृत भाषांचा स्वीकार व पुरस्कार करुन बौध्द परंपरा चालविली'.[४] श्री चक्रधरस्वामी, ज्ञानेश्वर, एकनाथ यांची लोकभाषेच्या संदर्भातील जी तळमळ होती तिचा उगम त्यांनी बुध्दात दाखविली आहे. मराठी संतावर शून्यवादाचा प्रभाव कसा आहे सांगत, हा शून्यवाद ज्ञानेश्वरांना बौध्द धर्मातून सिध्द व नाथांच्या मार्फत लाभला आहे. कारण तो कितीही शोधला तरी वेद व उपनिषदात सापडत नाही'.[५] असे म्हटले आहे.

माधवराव बागल यांनी 'लोकशाही समाजवाद व निधर्मीराज्य' या संदर्भात काही टिप्पणी केली आहे. भारतीय समाज अजून लोकशाहीला अनुकूल आहे असे नाही कारण देवधर्म, पुनर्जन्म या अंध:श्रध्देने पछाडलेला कोणताही देश असो, तो मनापासून लोकशाही समाजवादाचा अंगीकार करु शकणार नाही असे ते म्हणतात. 'निधर्मी राज्य आणि सर्वधर्म सहिष्णूता यांची सांगड घालणे कदाचित शक्य नाही. धर्मभेद आला की, धर्मद्वेष आलाच. माझाच धर्म श्रेष्ठ ही भावना चुकवता येत नाही. सर्वधर्मसमभाव ही कल्पना अव्यहार्य आहे म्हणून जातिसंघटना व धर्मसंघटना मग त्या शैक्षणिक असोत वा कोणत्याही विषयाच्या असोत ज्याने त्याने दुसऱ्याचा द्वेष न करता आपली उन्नती करावी या ध्येयाने प्रेरित असोत, त्यातून अलगपणा वितुष्ट व संकुचित वृत्ती निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही'.[६] कोणत्याही धर्माने पोटाचा प्रश्न सोडविलेला नाही. अध्यात्मावरील समता ही दरिद्री, बेकार, पोटार्थी समाजाला निरोपयोगी आहे. मायावाद ही फसवणूक आहे. प्रत्येक धर्माने, आहेरे ला पाठिंबा दिला आहे व निष्क्रियतेत प्रोत्साहन दिले आहे. असा कयास त्यांच्या लेखातून दिसून येतो. पुढे त्यांनी जातीभेद, धर्मभेद नव्हे तर राष्ट्रभेदही कमी करुन सर्व मानव आम्ही एक आहोत ही भावना निर्माण होणे गरजेचे आहे. असे सूचित केले आहे. मानवतावादाची भारतालाच नव्हे तर जगाला आवश्यकता आहे. परंतु दुर्दैवाने आपल्याकडे तसे घडत नसल्याचे आपल्या लेखातून स्पष्ट केलेले आहे.

सार्वजनिक जीवनात ज्यांनी प्रवेश केला व ज्यांच्या कार्याचा ठसा सामाजिक, राजकीय व इतर क्षेत्रावर आहे. अशांच्या संदर्भात अस्मितादर्शमधून लिखाण आलेले आहे. त्यापैकी धनंजय कीर यांचा 'फुले आणि चिपळुणकर' (अस्मितादर्श दिवाळी अंक १९७६) हा लेख अभ्यासनीय आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लेखनातील विचारांचा भर भारताच्या गतकालीन वैभवाचे पोवाडे गाण्याकडे विशेष होता. त्यांचे स्तूर्तिस्थान भौगोलिक आणि ऐतिहासिक कल्पनावर अधिष्ठित असल्यामुळे देश म्हणजेच जनता ही त्यांची कल्पना नसून देश म्हणजे भौगोलिक स्थळे, भाषा आणि संस्कृती परंपरा, जुन्या रुढी आणि प्रसिध्द व्यक्तींचा इतिहास, अशी होती'.[७] या सर्वांबद्दल अभिमान हाच खरा स्वदेशाभिमान अशी व्याख्या त्यांच्या मनावर बिंबली होती. हिंदू धर्मावर, हिंदू रुढीवर जो टिका करी याच्यावर चिपळूणकर त्वेषाने तुटून पडत असत. एकंदरित या लेखातून धनंजय कीरांनी म.फुले, लोकहितवादी यांच्या कर्तृत्वाचे स्मरण केले आहे. तत्कालिन परिस्थितीत विष्णुशात्री चिपळूणकरांनी म.फुलेंवर केलेले आरोप, त्यांची नालस्ती किती पूर्वग्रहदूषित व धादांत होती हे दर्शविले आहे.

सामाजिक दृष्टिकोनातून ऐक्य साधण्यापेक्षा ब्राम्हण प्रेमातून त्यांची दरीच कशी वाढविली याची चर्चा या लेखातून झाली आहे. 'चिपळूणकरांनी समाजसुधारकांवर आणि विशेषत: ज्योतिरावांवर आणि सत्शोधक समाज ह्यावर कठोरपणे हल्ला केल्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक ऐक्याला तडे गेले. अशा प्रकारे चिपळूणकरांच्या लेखणीने महाराष्ट्र दुभंगून गेला'.[८] यावरुन याची प्रचीती येते.

चिपळूणकरांचे सध्या महाराष्ट्रात काय स्थान आहे हे सांगताना त्यांनी लिहिलेले जॉन्सन, इंग्रजी भाषा, मोरोपंत आणि ववतृत्व यात आता विशेष सार उरलेले नाही. त्यातील भाषेचा डौल आणि जोष हा इतिहासजमा झाल्याचे सांगितले आहे. उलट 'आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात लोकहितवादीचे स्थान विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या स्थानापेक्षा श्रेष्ठ आहे आणि ज्योतिराव व दयानंद हे दोघेजण आधुनिक हिंदूस्थानातील सत्यशील महापुरुष म्हणून ओळखले जातात'.[९] या शब्दांत या समाजसुधारकांचा यथोचित गौरव केलेला आहे.

महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रात आंबेडकरवादाची मांडणी केली जात आहे, या पार्श्वभूमीवर रावसाहेब कसबे यांचा आंबेडकरवाद (अस्मितादर्श दिवाळी अंक १९७७ पृ. ६४) हा लेख महत्वाचा व आंबेडकरवादाची अभ्यासनीय मांडणी करणारा आहे. भारतीय इतिहासात आंबेडकरांनी दलितांची कोणालाही हेवा वाटावा अशी अभेद्य संघटना निर्माण केली. पण आंबेडकरोत्तर कालखंडामध्ये त्याची विविध स्वरुपात विभागणी झाली. या विभागल्या गेलेल्या चळवळींना आंबेडकरी विचाराला साधनाचे स्वरूप दिले. 'त्याचा केवळ एका हत्यारासारखा उपयोग करण्याचे ठरविले ही एक गंभीर स्वरुपाची, क्लेष देणारी वृत्ती आहे'.[१०] या शब्दांत सध्याच्या वस्तुस्थितीवर त्यांनी बोट ठेवले आहे.

रिपब्लिकन पक्षाचे सर्व गट, काँग्रेसमध्ये गेलेले काही दलित कार्यकर्ते, दलित पँथरचे सर्व गट, दलित साहित्यातील सर्व अंत:प्रवाह स्वत:ला आंबेडकरवादी समजतात, पण ते खरोखर आंबेडकरवादी आहेत काय ? असा सवाल कसबेंनी आपल्या लेखात केलेला आहे व हा वाद कोणीही स्वत:ला आंबेडकरवादी समजण्याइतका सवंग नाही अशी पुष्टी जोडलेली आहे. आंबेडकरांच्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना स्वत:च्या तत्वज्ञानाला सूत्रबध्द करून एक वाद आयएसएम किंवा चिंतनपरंपरा तयार करण्यात वेळ मिळाला नाही, असेही त्यांनी सांगितले आहे व 'आंबेडकरवादाची सूत्रबध्द मांडणी उपलब्ध नसल्यानेच आंबेडकरवादाचे स्वरुप सवंग झालेले आहे'.[११] आंबेडकरांचा नंतर जसा सॉक्रेटिसला प्लेटो, प्लेटोला ॲरिस्टॉटल शिष्य मिळाला तसा आंबेडकरांना मिळाला नाही म्हणून त्याला सवंग स्वरुप प्राप्त झाले आहे, असे सूचित केले आहे.

आंबेडकरवादाची मांडणी करताना आंबेडकरकारलीन समकालीन हिंदूत्ववाद, गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद याचा संदर्भ लक्षात घेणे कसबेंनी महत्वाचे व सरळ मानले आहे. कारण कोणताही महापुरुष हे परिस्थितीचे अपत्य असते. ज्या काळात ज्या परिस्थितीत तो वाढतो त्या परिस्थितीचे तत्कालीन विचारप्रवाहांचे त्यावर संस्कार होणे अटळ असते. केवळ बाबासाहेब वाचून आंबेडकरवाद मांडण्याचा प्रयत्न एकांगी व अभिनिवेशी स्वरूपाचा होण्याचा धोका आहे म्हणून तत्कालीन पार्श्वभूमीवरच तो मांडला गेला पाहिजे असा आग्रह प्रस्तुत लेखकांनी धरलेला आहे.

एखाद्या वादाकडून विश्व, माणूस समाज यांच्यासंबंधी कालौघात उपस्थित होणाऱ्या विविध प्रश्नांची उत्तरं असावीत एवढी किमान अपेक्षा असते, परंतु या सर्व प्रश्नांची उत्तरे किंवा यांचा स्वतंत्रपणे विचार बाबासाहेबांनी केला असावा असे त्यांच्या उपलब्ध वाङ्मयावरुन दिसत नाही, परंतु ही अडचण भगवान बुध्दाला गुरु करुन त्यांनी सोडविली आहे असे कसबेंचे म्हणणे आहे.

केवळ हिंदू धर्माविरोधीची प्रतिक्रिया म्हणून बाबासाहेबांनी बौध्द धर्म स्विकारला नाही तर बौध्द धर्म ही बुध्दपूर्व आणि बुध्दोत्तर जन्मलेल्या सर्व जागतिक धर्माविरोधीची एक सामर्थ्यवान प्रतिक्रिया आहे. तसेच दलित तरुण हा अधिक पुरोगामी व विद्वाननिष्ठ बनतो आहे याचे कारण धर्मांतर आहे. राजकीय स्वार्थासाठी गेली अनेक वर्ष त्याला जातिधर्मांच्या जाळयात अडकवून ठेवण्याचा प्रयत्न होत असला तरीही बंधने झुगारुन देणारी वृत्ती दलित तरुणांमध्ये वेगाने वाढत आहे. अशी निरीक्षणे या लेखात आढळतात.

विचारांची गुलामी नाकारणे, शब्दप्रामाण्य नाकारणे जबाबदार व्यक्तीने पुर्नविचार करणे व तद्नंतर मतांतर करणे अशी काही आंबेकरवादाची सूत्रे या लेखातून स्पष्ट होतात.

प्रबोधनाच्या मुक्त आणि बंदिस्त कसा हा डॉ.पंढरीनाथ रानडे (अस्मितादर्श दिवाळी अंक ७७) यांचा लेख अभ्यासपूर्ण आहे. भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे येथील हा भाष्य लेखरुपाने अस्मितादर्शमध्ये प्रकाशित झाले आहे. प्रबोधनाचे स्वरुप, भारताच्या ऐतिहासिकतेत कार्ल मार्क्सचं स्थान, प्रबोधनाच्या कसा, राष्ट्रवादाची जागतिक दृष्टी, बंदिस्त

कक्षांची मीमांसा, प्रबोधनाची इतिहास दृष्टी नवागत-परंपरागत या संदर्भातील त्यांनी केलेले विवेचन अभ्यासपूर्ण व प्रबोधनाची दृष्टी देणारे आहे.

पंधराव्या शतकानंतर युरोप खंडात ज्या सामाजिक, संस्कृति आणि राजकीय चळवळी झाल्या व या चळवळीच्या आघाताने मध्ययुगीन धर्मसत्ता सरंजामी राजसत्ता संपुष्टात येऊन आधुनिक लोकसत्ता, राष्ट्रसत्ता आणि धनसत्ता यांचा उदय झाला. याचा निर्देश प्रबोधनयुगात इतिहासकार करीत असतात असे त्यांनी म्हटले आहे.

'भारताच्या संबंधी मार्क्सची दृष्टी भावविव्हळ हितचिंतनाची नूतन ऐतिहासिक विश्लेषणाची आहे. इंग्रजी राजवटीमुळे भारतीय सामाजिक जीवनाची झालेली उलथापालथ उद्वेगजनक असली तरी ऐतिहासिकदृष्ट्या हे घडणे आवश्यक असल्याचे मार्क्स बजावतो'.[१२] भारतीय समाज बरवर कितीही निष्पाप दिसत असला तरी मानवी मनाला शक्य तितक्या लहान क्षेत्रात कोंडणारे होते. या परंपरागत समाजविश्वाला उध्वस्त करुन इंग्रजी राजवटीने सामाजिक क्रांती घडवून आणली असे मार्क्सचे भारतीय समाज जीवनाविषयी मत होते असे प्रस्तुत लेखकाने म्हटले आहे.

भारतीय प्रबोधनाच्या संदर्भात ह्यांनी इतर देशाप्रमाणेच भारतातही सामाजिक विद्रोहाची परंपरा प्राचीन पुरातन असल्याचे म्हटले आहे. सामाजिक समतेची संकल्पना एक मूल्य म्हणून भारतीयांना परिचयाची होती. असे सांगून यासाठी संतचळवळ, म.ज्योतिराव फुले, न्या.रानडे, सार्वजनिक काका यांच्या कार्यांची ओळख या संदर्भात प्रस्तुत लेखकांनी करून दिली आहे.

भारतीय राष्ट्रवाद हा नुसता संकुचित स्वरूपाचा नाहीतर 'भारतीय राष्ट्रवादाच्या बौध्दिक वातावरणावर जागतिक घडामोडीचा आणि वैश्विक विचारप्रवाहांचा सतत प्रभाव पडला आहे. राजा राममोहन रॉय, विवेकानंद आणि रविंद्रनाथ टागोर ह्या भारतीय प्रबोधनाच्या विश्वविख्यात विभूती आहेत'.[१३] असे म्हटले आहे. दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोपाळ कृष्ण गोखले, पंडित नेहरू यांना युरोपीय जगातून मिळालेली स्फूर्ती आणि प्रेरणा यांचा उल्लेख या लेखात आढळतो.

नवागत आणि परंपरागत या संदर्भात भारतातील १९ व्या शतकातील प्रबोधनाचे स्वरूप विशद करताना ती प्रबोधनाची पाळंमुळं परंपरेतच आहेत असे प्रस्तुत लेखकांनी सुचविले आहे. गतकालीन प्रेरणेवरच या काळातल प्रबोधन घडून आले आहे. 'मार्क्सच्या वैचारिक क्षितिजाकडे झेपावण्याचे सामर्थ्य आपल्या एकोणिसाव्या शतकात कुणाच जवळ नव्हते'.[१४] म्हणून मार्क्सने जे क्रांतीच्या संदर्भात विचार सांगितले त्यापेक्षा याचे स्वरूप भिन्न होते. असे प्रस्तुत लेखकाने सुचविले आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात महाडच्या सत्याग्रहाला महत्व आहे. ती एक ऐतिहासिक घटना आहे. परंतु महाडच्या या समता संगराबद्दल बरेच समज-गैरसमज अस्तित्वात आहेत या संदर्भात रत्नागर गणवीर यांचा लेख वस्तुस्थितीचा आढावा घेणारा आहे. इतिहास म्हणून तपशील व कालसंगतीची अचूकता आसणे महत्वाचे असते. महाडच्या या सत्याग्रहासंबंधी त्यांनी साधकबाधक चर्चा करुन कालसंगतीची व तपशिलाची सुनिश्चितता आपल्या लेखातून केली आहे. (महाड समता संगर : समज व गैरसमज (अस्मितादर्श नोव्हें.-डिसें-७७ पृ.५)

महाडला जो सत्याग्रह झाला तो दिनांक १९ व २० मार्च १९२७ ला अशी अनेकांची कल्पना आहे, परंतु रत्नाकर गणवीरांच्या मतेही कल्पना चुकीची आहे. त्यांच्या मते महाडमध्ये अस्पृश्यांच्या चळवळीच्या दोन परिषदा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याच अध्यक्षतेखाली आल्या होत्या. पहिली परिषद १९ व २० मार्च १९२७ ला भरली. त्या परिषदेचे नाव 'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद' होते. अस्पृश्यांचा आचार, विचार व उच्चारात बदल घडविणे, परंपरागत रुढीचे जोखड झुगारुन देणे हा या परिषदेच्या पाठीमागचा हेतू होता. तर दूसरी परिषद २५, २६ व २७ डिसेंबर १९२७ ला भरली होती. तिचे नाव 'सत्याग्रह परिषद' हे होते. महाडच्या चवदार तळ्यावर पाणी भरुन अस्पृश्यांच्या सार्वजनिक पाणवठ्यावरील हक्क प्रस्थापित करणे हा या परिषदेसाठी मागचा एकमेव हेतू होता. ह्यादोन्ही घटनांची निश्चित माहिती अनेकांना नसल्यामुळे या घटनांमध्ये गल्लत निर्माण झालेली आहे. कारण अनेक लोक या पहिल्याच परिषदेला 'महाड सत्याग्रह'

समजतात. रत्नाकर गणवीरांच्या मते, ही पहिली परिषद अस्पृश्यांच्या चळवळीत ओळखली जाणारी 'महाड क्रांती' होय. कारण या पहिल्या परिषदेतील २० मार्चच्या दिवशी घडलेल्या मारहाणीमुळे अस्पृश्याच्या मनात स्वाभिमानाची पहिली ठिणगी पेटली. त्या दिवशी माणुसकीसाठी बंड करण्याची खरी उर्मी त्यांच्या मनात जागृत झाली आणि ह्या जागृतीतून नऊ महिन्यानंतर ख्रिसमसच्या दिवशी पंचवीस डिसेंबरला 'महाड सत्याग्रह' परिषदेचा जन्म झाला. मनावतेसाठी क्रुसावर आत्मबलिदान करणाऱ्या येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस हा अस्पृश्यांच्या मानवतेच्या हक्काचा 'सत्याग्रह' ठरला'. या शब्दांत वस्तुस्थितीचे निर्देशन गणवीरांनी आपल्या लेखातून केलेले आहे.

१९७४ च्या वाङ्मय शोभेच्या दिवाळी विशेषांकात डॉ.ह.रा.दिवेकरांनी 'भारतीय प्राचीन ग्रंथांना अपेक्षित शासन-व्यवस्था' असा लेख लिहिला होता. त्याला प्रतिक्रिया म्हणून 'डॉ.आंबेडकर आणि प्राचीन शासन-व्यवस्था' हा लेख (अस्मितादर्श एप्रिल-मे-जून ७५) रत्नाकर गणवीरांनी लिहिला आहे. स्वतंत्र भारताच्या लोकशाहीप्रणीत शासनव्यवस्थेच्या संदर्भात डॉ.आंबेडकरांवरील टीका. बौध्द धर्म चांगला आहे असे म्हणणारे व भारतवर्षातल्या अनेक लोकांत हिंदू धर्मातून फोडून बौध्द धर्मात ओढणारे महात्मे असे बाबासाहेबांविषयी डॉ.दिवेकरांचें उद्‌गार त्यांचे रत्नाकर गणवीरांनी प्रस्तुत लेखात साधार खंडन केलेले आहे.

स्वतंत्र भारताच्या घटना मंडळातील सर्व सभासद आंग्लविद्याविभुषित असून त्यांना भारतीय प्राच्य विद्येचे ज्ञान नव्हते. यामुळे प्राचीन भारतीय ग्रंथात काय सांगितले आहे, याची त्यांना माहिती नव्हती किंवा असली तरी ती इंग्रजी भाषेच्या बोलण्यातूनचं घेऊन मिळालेली होती. असा कयास सांगून त्यांनी वैदिक ग्रंथ अभ्यासिले नाहीत असे मत डॉ.दिवेकरांनी आपल्या लेखातून मांडलेले आहे.

बुध्द धर्मातील लोकशाही व प्राचीन निवडणूक पध्दती याचा उहापोह करणारे डॉ.आंबेडकरांचे २५ नोव्हेंबर १९४९ ला लोकसभेत केलेले भाषण बौध्द भिक्षू संघाच्या गणतंत्री शासन व्यवस्थेसंबंधीचे महत्वाचे व ऐतिहासिक भाषण असल्याचे सांगून गणवीरांनी डॉ.आंबेडकरांना प्राचीन भारतीय शासनव्यवस्था माहीत नसल्याच्या मतांचे खंडन केले आहे. तसेच डॉ.आंबेडकरांनी केलेले धर्मांतर ही गोष्ट किती सुसंगत व वैचारिक होती याची मीमांसा या लेखातून केली आहे. यासाठी त्यांनी 'बहिष्कृत भारता' चा २९ जूलैच्या अंकातील अग्रलेखाचा आधार घेतला आहे. डॉ.आंबेडकरांचे विशिष्ट वर्गातल्या लोकांना पिढ्यान् पिढ्या इहलोकीच्या नरकयातना भोगावयास लावतो. माणसे असून त्यांना जनावरांनाही मिळणाऱ्या सवती लाभू देत नाही तो धर्म तरी कसला ? हे विचार घेऊन डॉ.दिवाकरांच्या अनेक लोकांत हिंदूधर्मातून फोडून बौध्द धर्मात ओढणारे महात्मे या विधानाचे खंडन केले आहे.

'मनुस्मृतीचा ग्रंथ जाळून त्यातील सिध्दांत नाहिसे करता येतील काय ? जाळणाऱ्यांनी तो वाचला आहे काय'?[१५] हा प्रश्न डॉ.दिवेकरांनी निर्माण केले आहेत. यासाठी गणवीरांनी २५ डिसेंबर १९२७ च्या महाडच्या परिषदेतील ठरावांचा आधार घेऊन त्याचे समर्थन केले आहे. 'म.गांधींनी विदेशी कपडा जाळून काय साधले ? खान-मानिनीच्या विवाहाच्या प्रकरणात 'ज्ञानप्रकाशां' ची होळी करणाऱ्या लोकांनी काय साधले ? 'सायमन कमीशनवर बहिष्कार घालून जे साधणार आहे ? तीच गोष्ट आम्हाला मनुस्मृती जाळून साधावयाची आहे'.[१६] अशा शब्दांत आपली मीमांसा दिलेली आहे.

अस्पृश्यता ही अस्पृश्यांनी निर्माण केली नसून हिंदूंच्या मनोवृत्तीचे ते द्योतक आहे. हिंदू धर्मग्रंथांनी त्यात बळही दिले आहे म्हणून अस्पृश्यता नष्ट करण्याची जाणीव अस्पृश्यांना देण्यापेक्षा सवर्ण हिंदूनाच देणे आवश्यक आहे असे प्रस्तुत लेखकाचे मत आहे. 'जातिभेदाच्या बाबतीत लोकांचा सारा रोख ब्राम्हणावर असतो. जातिभेद अस्पृश्यांमुळेच कसा निर्माण झाला इत्यादी डॉ.दिवेकरांच्या मतांचे यथासांग खंडन प्रस्तुत लेखकाने केले आहे व यासाठी डॉ.आंबेडकरांच्या 'बहिष्कृतभारता' तील विचाराचा आधार घेतलेला आहे.

डॉ.दिवेकरांनी भात व गहू या दोन भिन्न प्रकारच्या धान्याच्या नैसर्गिक भेदांचे उदाहरण देऊन जातिभेदाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'मनुष्यजाती म्हणून जरी सर्व माणसे सारखी मानली तरी त्यांच्यातले भेद नाहीसे करता येत नाहीत. वर्णभेद, शक्तिभेद, कार्यशक्ती व भोगशक्ती, बुध्दीभेद इ. भेद गृहित धरावेच लागतात'.[१६] या त्यांच्या विधानावरून त्याची प्रचीती येते. यावर 'सुशिक्षित मनुष्यही जेव्हा नैसर्गिक भिन्नतेकडे पाहून अहो ही उच्चनीच भावना राहणारच', असे म्हणून जातियतेच्या बाह्यभेदाचा बाऊ करू लागतो, तेव्हा त्याने अंतर्यामी समानतेचे कितीही गोडवे गाईले तरी त्याला काय अर्थ'. या शब्दांत डॉ.दिवेकरांच्या कोणत्याही विवेकशील माणसाला पटणारी आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय संघटना हा प्रा.गंगाधर पानतावणे यांचा अस्मितादर्शमधील बाबासाहेबांच्या सामाजिक, राजकीय कर्तृत्वाची ओळख करून देणारा व प्रेरणादायी स्वरूपाचा लेख आहे. मध्यमवर्गीय कुटुंबाशी समजासुधारणाचा रोख असलेल्या काळात म.फुले यांनी केलेले कार्य सर्वश्रुतच आहे. या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकात डॉ.बाबासाहेबांनी केलेले कार्य ऐतिहासिक स्वरुपाचे आहे. सामाजिक प्रश्नांची गरज लक्षात घेऊन बहिष्कृत हितकारिणी सभा (स्थापना २० जूलै, १९२४) व समाज समता संघ (स्थापना ४ सप्टेंबर १९२७) या संघटना त्यांनी निर्माण केल्या तर स्वतंत्र पक्ष (स्थापना ऑगस्ट १९३६) आणि अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन (स्थापना जूलै १९४२) या अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी झुंजणाऱ्या संघटनांना जन्म दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे प्रभावी नेतृत्व हा या सामाजिक व राजकीय संस्थांचा कणा असल्यामुळे त्यांच्या या कार्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न या लेखातून दिसून येतो.

समाज समता संघात अस्पृश्यतेवर लोकांचाही सहभाग होता. संबंध हिंदू समाजाचा एक व्यापक पातळीवरून या माध्यमातून विचार होऊ लागला. सहभोजन, अस्पृश्यांची मौजी बंधने, या माध्यमातून समाज परिवर्तनाची भूमी हळुहळू सुपिक होऊ लागली. सारांश वर्षानुवर्षे थंड गोळ्याप्रमाणे पडलेल्या समाजाला आकार देण्याचे, चेतविण्याचे काम या संघटनांनी केलेले आहे. दलितांच्या सामाजिक व राजकीय हक्कांसाठी त्यांच्या मनात या संघटनांनी आत्मविश्वास निर्माण केला.

भारतीय कलेमध्ये चैत्य स्तूप आणि विहार या वास्तूंना फार महत्वाचे स्थान आहे. इ.स.पूर्व पाचव्या शतकापासून ते इ.स.च्या दहाव्या शतकापर्यंतच्या दीड हजार वर्षांच्या काळात भारतात हजारो चैत्य, स्तूप आणि विहार निर्माण करण्यात आले. याचे स्वरूप विशद करणारा प्रा.बाळकृष्ण दाभाडे यांचा अस्मितादर्शमधील लेख (अस्मितादर्श, दिवाळी अंक १९७३) चैत्य, स्तूप आणि विहार यांची ओळख करून देणारा आहे.

चैत्य म्हणजे एक प्रकारची पवित्र आणि पूज्य वास्तू होय. हिंदुस्थानात आर्यांचे आगमन होण्यापूर्वी चैत्यपूजा रुढ होती, असे पुरावे सिंधू संस्कृतीमध्ये उपलब्ध झाले आहेत. हे चैत्य प्रथम वृक्षाच्या रुपात आढळतात. वृक्षपूजा त्या समाजात फार लोकप्रिय होती. प्रस्तुत लेखकाच्या मते ही चैत्यमंदिरे दोन प्रकारची होती मोकळ्या जागेवर निर्माण झालेली चैत्य-मंदिरे व पर्वतात खोदून काढलेली गुहा-चैत्य मंदिरे, सांची, तक्षशिला, अमरावती, ब्रम्हगिरी, तेर इ. स्थानी असलेल्या चैत्य मंदिराचे अवशेष अजूनही आहेत. तर पर्वतात खोदून निर्माण केलेली अनेक चैत्य-मंदिरे आजही सौंदर्याची साक्ष देतात. अजंठा, कार्ले, भाजे, पितळखोरा इत्यादी लेण्यातील समूहात उत्तम चैत्य आहेत. प्रस्तुत लेखकांच्या मते या सर्वांतून तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक प्रथांचे अविस्करण झालेले आहे.

'स्तुपा' च्या संदर्भात प्रा.बाळकृष्ण दाभाडे म्हणतात, 'स्तुप या वास्तूंची इतिहास परंपरा चैत्याप्रमाणेच भूतकाळाशी निगडीत आहे. आर्येत्तर आणि आर्य या दोन्ही मानवजमातीत स्तूपसदृश्य वास्तू निर्माण होत असत. या वास्तूचा संबंध महापुरुषांच्या मृत्युशी असतो ही वास्तू एक प्रकारचे स्मारक असे. याला आजकाल आपण समाधी म्हणतो'.[१७]

स्तुपाचे अस्तित्व बुध्दपूर्व काळातसूध्दा होते, असे प्रस्तुत लेखकाचे मत आहे. बौध्दांच्या स्तुपांचे प्राचीनतम नमुने गोलाकार स्वरूपाचे आहेत. ज्या पुरुषांचा स्तूप असेल त्याच्या अस्थी साधारणतः त्यात ठेवल्या जातात. बुध्दाच्या अस्थी असलेला कपिलवस्तू येथील स्तूप मूळ आकारात उपलब्ध झाला आहे, असे या लेखातून आढळते.

भिक्षू ज्या ठिकाणी राहतात त्या निवासस्थानास 'विहार' म्हणतात. 'विहार ही वास्तू भगवान बुध्दाच्या कालापासून अस्तित्वात आली. बुध्दाच्या शिष्यसमुदायात जशी जशी वाढ होऊ लागली तसतशी त्यांच्या राहण्यासाठी काही ना काही व्यवस्था करावी लागली. त्यातून 'विहार या वास्तूप्रकाराचा विकास होऊ लागला'.[१८] हे विहार म्हणजे भिक्षू-भिक्षुणीची निवासस्थाने असत. विद्यापीठाचे केंद्र असत. नालंदा, विक्रमशीला, इत्यादींचे नावे आपण ऐकतोच एकंदरीत बौध्द संस्कृतीशी निगडीत असणाऱ्या चैत्य, विहार, स्तूप इत्यादी कलांची ओळख करुन देण्याचा प्रयत्न या लेखात झालेला आहे. प्रत्येक कलेची तपशीलवार मांडणी या लेखात आढळून अयेते. या लेखाच्या पूर्तीसाठी प्रस्तुत लेखकाने 'विनयपिटक, कला के प्राण बुध्द - ले. जगदीशचंद्र. The Stupa of Bharat,By A. Cunminaham. इ. पुस्तकांचा आधार घेण्यात आला आहे'.

'देवकल्पना व समाजविघटन : काही विचार या लेखात प्रा.प्रभाकर पोहरे यांनी भारतीय संस्कृतीतील देव-देवतांचे दाखले देऊन देवकल्पनाही मानवी मनाला तोषविणारी कल्पना आहे. भारतात या कल्पनेने स्तोमय माजविले आहे. त्याचा परिणाम भारतीय जीवनावर झालेला आहे. एकसंधाय राहिले नाही. समाजविघटनास याच प्रवृत्ती कारणीभूत झाल्या.देवदेवता त्यांचे प्रकार धर्म वर्चस्वाच्या प्रवृत्तीतून जन्माला आल्या असल्याने भारतीय जीवनाला वेळोवेळी तडे यामुळे गेले आहेत. अशा प्रकारचे निष्कर्ष नोंदविले आहेत'.

डॉ.वसंत भाले यांनी 'क्रांतिकारी नवमानवतावाद' या लेखात 'मानवेंद्रनाथ रॉय यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे'. माणूस जन्मतःच बुध्दिवादी असतो. हे मानवेंद्रनाथ रॉयच्या विचारांचे पहिले सूत्र होते. बुध्दीची अमर्याद झेप माणसाला प्रगतीकडे नेते. जिथे बुध्दी थांबते तिथे श्रध्दा सुरु होते. ही श्रध्दा प्रगतीची दारं बंद करते व माणसाला परागतीस नेते. आपली बुध्दी वापरण्याचे मुक्त अवधान व्यक्तीस लाभावे यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यकता आहे म्हणून 'व्यक्तीस्वातंत्र्य' हे रॉय यांनी सर्वश्रेष्ठ मूल्य मानले असे सांगून धर्म हा व्यक्तिस्वातंत्र्याचा शत्रू आहे तो व्यक्तिस्वातंत्र्यात अडथळा निर्माण करतो. पौर्वात्य व पाश्चिमात्य राष्ट्रात धर्म हा नेहमीच बलवानांच्या मागे उभा राहिलेला आहे, असा निष्कर्ष नोंदविला आहे. स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्यांची पिळवणूक करण्या करिताच धर्माचा उपयोग केला गेला आहे. सध्याच्या जीवनातही धर्म ही श्रध्दा व अंधश्रध्दा बळावणारी बाब आहे, व्यवितत्व आपली बुध्दी वापरण्यापासून परावृत्त करते अशा प्रकारची टिपणी या संदर्भात प्रस्तुत लेखकांनी केलेली आहे.

मानवेंद्रनाथांच्या संदर्भात 'डॉ.वसंत भाले' यांनी विवाह, कुटूंबसंस्था वर्ग व समाज हा बुध्दिवादातील आणखी अडथळा त्यांनी मांडला आहे, रुढी परंपरा व वर्णव्यवस्था ह्यांनी जखडलेला समाज जेव्हा एखाद्या बंधनाने व्यक्तीस जखडून ठेवतो तेंव्हा ती व्यक्तीही त्या रुढी परंपरेचो भागीदार बनते व ती बंधने तोडणे तिला कठीण जाते, अशा कृत्रिम बंधनांनी जखडलेली व्यक्ती आपल्या बुध्दीचा वापर करण्यास असमर्थ ठरते. प्रगतीतील अडथळे दूर करण्याकरिता ही बंधनंच नाहिशी केली पाहिजेत असे त्यांचे मत होते असे प्रतिपादिले आहे.

रॉयचा क्रांतिकारी नवमानवतावाद राष्ट्रवादाच्याही मर्यादा उल्लंघन करून सर्व जगातील माणूस हा प्रथम माणूस आहे हा विचार करणारा आहे.

आर्य सत्ये एक नीतिशास्त्रीय अभिप्राय या लेखात प्रशांत शेंडे यांनी बुध्दाला झालेल्या चार आर्य सत्याची प्रचिती व त्याचा प्रीतीशास्त्रीय अभिप्राय विस्ताराने दिला आहे.

गौतमबुध्दाला ज्या अंतिम सत्याचे जे साक्षात ज्ञान झाले त्याच्या आधारे त्यांची चार प्रमुख सिध्दांताचे प्रतिपादन केले. ते खालीलप्रमाणे आहे.

१) मानवी जीवन दुःखमय आहे. २) दुःख हे कारणपरंपरेने उद्भवते

३) त्या कारण परंपरेचा निरास केल्याने दु:खाचा सर्वस्वी विरोध होतो, तेव्हा दु:खाचा विरोध करणे शक्य आहे.

४) दु:क्ष निरोधाचा अश्टृविध मार्ग आहे.

पहिल्या सिध्दांता संदर्भात अभिप्राय असा आहे की, जीवनामध्ये दु:खाबरोबरच सुखालाही स्थान आहे. हा सामान्य मनुष्याचा दृष्टिकोन चुकीचा आहे. जीवनात सुख संभवतच नाही. ज्याला सामान्य माणूस सुख मानतो ते परिणामी दु:खच असते, तेव्हा सामान्य माणसाचा इहलोकीचा सुखाचा शोध अवास्तव आणि म्हणून विफल ठरतो. 'मानवी जीवन हे स्वरुपत:च दु:खमय आहे. जीवनातील दु:खे टाळू म्हटल्याने टाळता येत नाहीत.[१९]

दुसऱ्या सिध्दांताच्या संदर्भात दु:खाची कारणपरंपरा सांगतात, अविद्या, संस्कार, विज्ञान, नामरुप, षडायतन, स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव, जाति, जरा याचा समावेश केला आहे. तर तिसऱ्या सिध्दांताबद्दल 'जोपर्यंत मानवी व्यक्तित्व अस्तित्वात आहे तोपर्यंत दु:ख अपरिहार्य आहे म्हणून व्यक्तित्वाचा सर्वस्वी विनाश हाच दु:खविनाशाचा उपाय होय'.[२०] तसेच दु:ख निरासाच्या उपायाची सम्यक-दृष्टी, सम्य-संकल्प, सम्यक-वाक्, सम्य-कर्मांत, सम्यक आजीव, सम्यक-स्मृती आणि सम्यक-समाधि अशी आठ अंगे सांगितली आहेत.

एकंदरित बुध्दाच्या गंभीर चिंतनातून ही सत्ये निर्माण झालेली आहेत. ती स्थूल व स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न या लेखात झालेला आहे.

कोणत्याही देशाची राज्यघटना ही त्या देशाचा मुलभूत कायदा असतो. राज्यामधील सार्वभौम सत्तेचा वापर शासनसंस्थेकडून कशा प्रकारे केला जावा, त्याची कार्यकक्षा कशी असावी, त्याचप्रमाणे शासनसंस्था व देशातील जनता यांचे परस्परसंबंध कसे असावेत हेही निश्चित करणे कायद्याचे काम असते. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटना हा रावसाहेब कसबेंचा (दिवाळी अंक ७६) लेख महत्वाचा आहे.

मूलभूत कायद्याला त्या देशाचा इतिहास समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था व संस्कृतीचे संदर्भ असतात, पण या बाबतीत भारतीय राज्यघटनेचे स्वरूप, 'भारतीय राज्यघटनेला भारताचे असे खास कोणतेही संदर्भ दिसत नाहीत. जे थोडेफार संदर्भ आहे ते अतिशय तकलादू असून केवळ ब्रिटीश राजवटीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवरच ही राज्यघटना उभी केलेली दिसते'.[२१] या शब्दांत आपले मत नोंदविले आहे. प्रजासत्ताक गणराज्याची परंपरा क्वचितच असणाऱ्या भारताच्या राज्यघटनेची उद्देशपत्रिका वाचताना आश्चर्याचा धक्का बसतो असे प्रस्तुत लेखकाचे म्हणणे आहे. ते म्हणतात की, ज्या देशात वॉरन हेस्टिंग्जच्या आगमनापर्यंत न्यायाची कल्पना व्यक्तीच्या जन्मजात सामाजिक दर्जावर उभी होती. ज्या देशाला विचार व उच्चाराचे स्वातंत्र्य नाकारल्याची खूप मोठी परंपरा आहे आणि ज्या देशातील समाज वर्णव्यवस्थेवर कर्मसिध्दांतांच्या प्रभावाखाली शेकडो वर्ष होता, त्या देशाला राज्यघटनेच्या रुपाने राजकीय क्षेत्रात स्विकारलेली ही नवमूल्ये कशी पचनी पडावीत ? हा खरा प्रश्न आहे हे त्यांनी आपल्या लेखातून सूचित केलें आहे. 'प्रजासत्ताक गणराज्य स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या नवमूल्यावर आधारलेली राज्यघटना आणि राजेशाही, पारतंत्र्य, विषमता, वैर आणि अन्यायी रुढी यांचे शेकडो वर्षांचे संस्कार असणारा समाज यात जो गेली पंचवीस वर्ष अदृश्य संघर्ष चालू आहे. या संघर्षांकडे कोणी लक्ष देणार आहे काय'.[२२] असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सामाजिक जीवनातील मूल्यांच्या संदर्भात राजकीय मूल्यांनी सतर्क राहिले पाहिजे. राजकीय मूल्यांचे सामाजिक स्तरावर स्वागत झाले पाहिजे, त्याला पोषक वातावरण तयार करुन दिले पाहिजे परंतू भारतीय राजकीय संघटना व सामाजिक संघटना यांचे या संदर्भात निराशाजनक कार्य आहे.

संदर्भ सूची :-

१) चिटणीस म.भि.-अस्मितादर्श (जाने-फेब्रु-मार्च-७८ अंक १) पृ. ३१.
२) पंडित नलिनी -अस्मितादर्श (जाने-फेब्रु-मार्च-७८ अंक १) पृ. ३७.

३) कसबे रावसाहेब -अस्मितादर्श (जाने-फेब्रु-मार्च-७८ अंक १) पृ. ३९.
४) लोखंडे भाऊ -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ. ३५.
५) लोखंडे भाऊ -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.३७
६) कीर धनंजय -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.३१
७) कीर धनंजय -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.३४
८) कीर धनंजय -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.३४
९) कसबे रावसाहेब -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.६४
१०) कसबे रावसाहेब -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.६४
११) रानडे पंढरीनाथ -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.१५३.
१२) रानडे पंढरीनाथ -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.१५५
१३) रानडे पंढरीनाथ -अस्मितादर्श (दिवाळी विशेषांक-१९७३) पृ.१६३
१४) दिवेकर ह.रा.-वाङ्मय शोभा.(दिवाळी १९७४) पृ.७७
१५) गणवीर रत्नाकर -अस्मितादर्श (एप्रिल ते जून ७५) - पृ.८
१६) दिवेकर ह.रा.-वाङ्मय शोभा.(दिवाळी १९७४) पृ. ७८
१७) दाभाडे बाळकृष्ण-अस्मितादर्श (दिवाळी अंक १९७३) पृ. २१
१८) दाभाडे बाळकृष्ण-अस्मितादर्श (दिवाळी अंक १९७३) पृ.२३
१९) शेंडे प्रशांत (अस्मितादर्श ऑगस्ट-नोव्हेंबर दिवाळी अंक १९७८) पृ.२५
२०) शेंडे प्रशांत (अस्मितादर्श ऑगस्ट-नोव्हेंबर दिवाळी अंक १९७८) पृ.३०
२१) कसबे रावसाहेब (अस्मितादर्श दिवाळी १९७६) पृ.३५.